**नियमित दिवाणी दावा क्रमांक १०१४/२०१५**

(सीएनआर क्र.एमएचएएच०८-००१५१९-२०१५)

**<u>निशाणी क्रमांक ५२ वरील आदेश</u>**

वादींनी सदरचा अर्ज दावा दुरूस्तीस परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. वादींचे अर्जातील कथन थोडक्यात असे :- दाव्यामध्ये दावा मिळकतींचे वर्णन देतांना सर्व्हे नं.८६/७ हा वाद विषय असतांना नजरचुकीने इतर उता-यांचे सर्व्हे नंबर व या उता-याचा सर्व्हे नंबरचा पोटहिस्सा नमुद करण्याचे अनावधानाने राहुन गेले. प्रतिवादी क्र.१ मयत झाल्यानंतर त्याचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी त्यांनी दि.१६.०३.२०१९ रोजी अर्ज दाखल केला होता परंतु तत्पुर्वी प्रतिवादी क्र.१ च्या वारसांनी सर्व्हे नं.८६/७ क्षेत्र ०.४१ हे आर या मिळकतीमध्ये वादींचा हिस्सा असतांना ती बेकायदेशिरपणे विक्री केली. सदर बाबतची माहिती वादींना ऑगस्ट २०२१ मध्ये झाली. वादींनी त्याच्या नकला काढल्या परंतु दरम्यानच्या कालावधीमध्ये कोरोना प्रादुर्भावामुळे न्यायालयीन कामकाज बंद होते त्यामुळे ते न्यायालयात येवु शकले नाहीत.

३. प्रतिवादी क्र.१अ ते १ड यांनी सर्व्हे नं.८६/७ क्षेत्र ०.४१ हे आर ही मिळकतप्रतिवादी क्र.४ यांना दावा प्रलंबित असतांना वादींचा हिस्सा डावलण्यासाठी विक्री केली आहे. प्रतिवादी क्र. ४ याने संगनमताने सदर मिळकत त्याच्या सुना सविता दत्तात्रय राउत, संगिता सोमनाथ राउत यांच्या नावे दि.०४.०८.२०२१ रोजी खरेदीदस्ताने हस्तांतरीत करून घेतलेल्या आहेत. त्यांना प्रतिवादी क्र.२३ व २४ म्हणुन दाव्यामध्ये सामील करून घेणे व त्या बाबतचा मजकुर नमुद करणे गरजेचे आहे. प्रतिवादींनी केलेले आपसातील विक्री व्यवहार हे वादींच्या संमतीशिवाय केले आहेत त्यामुळे ते त्यांच्या हिश्यावर बंधनकारक नाहीत या सर्व बाबी अभिलेखावर येणे गरजेचे आहे. सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. सबब, अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दुरूस्तीस परवानगी देण्यात यावी अशी विनंती वादींनी केली आहे.

४. वादींचे सदर अर्जास प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल करून सक्त हरकत नोंदवली आहे. प्रतिवादी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन करतात की, वादींनी प्रस्तुतचा अर्ज मुदतीत दाखल केलेला नाही त्यास कोणतेही कारण घडलेले नाही. सदरचा दावा दाखल करून तब्बल ८ वर्षे झालेली आहेत. सदर दाव्याचे कामकाज लांबणीवर पडावे या करीता वादींनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब, तो अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

५. अर्ज व म्हणणे वाचले तसेच दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादींनी सदरचा दावा वाटपासाठी, कब्जा तुटक होवुन मिळण्यासाठी व इतर मागण्यांकरीता दाखल केला आहे. वादींच्या म्हणण्याप्रमाणे, दाव्यामध्ये दावा मिळकतींचे वर्णन

देतांना सर्व्हे नं.८६/७ हा वाद विषय असतांना नजरचुकीने इतर उता-यांचे सर्व्हे नंबर व या उता-याचा सर्व्हे नंबरचा पोटहिस्सा नमुद करण्याचे अनावधानाने राहुन गेले. प्रतिवादी क्र.१ मयत झाल्यानंतर त्याचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी त्यांनी दि.१६.०३.२०१९ रोजी अर्ज दाखल केला होता परंतु तत्पुर्वी प्रतिवादी क्र.१ च्या वारसांनी सर्व्हे नं.८६/७ क्षेत्र ०.४१ हे आर या मिळकतीमध्ये वादींचा हिस्सा असतांना ती बेकायदेशिरपणे प्रतिवादी क्र.४ यांना विक्री केली. प्रतिवादी क्र.४ यांनी ती मिळकत संगनमताने त्याच्या सुना सविता दत्तात्रय राउत, संगिता सोमनाथ राउत यांच्या नावे दि.०४.०८.२०२१ रोजी खरेदीदस्ताने हस्तांतरीत करून घेतलेल्या आहेत. त्यांना प्रतिवादी क्र.२३ व २४ म्हणुन दाव्यामध्ये सामील करून घेणे व त्या बाबतचा मजकुर नमुद करणे गरजेचे आहे. वादींनी अर्जामध्ये नमुद केलेली घटना ही दावा दाखल झाल्यानंतर घडलेली आहे. प्रतिवादी क्र.४ च्या सुना सविता दत्तात्रय राउत, संगिता सोमनाथ राउत या कामी आवश्यक पक्षकार होतात त्यामुळे त्यांना दाव्यात सामील करून घेणे गरजेचे आहे. इतकेच नव्हे तर त्या बाबतची कथने अभिलेखावर येणे गरजेचे आहे. उपरोक्त नमुद दुरूस्तीस परवानगी दिल्याने दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होणार नाही तसेच त्यामुळे प्रतिवादींच्या हक्कांवर कोणतीही गदा येणार नाही. प्रतिवादींना या कामी दुरूस्त दाव्यावर अतिरिक्त कैफियत देण्याची संधी उपलब्ध होणार आहे. सदर दाव्याचा न्यायनिर्णय गुणवत्तेवर होण्यासाठी व या कामी पक्षकारांमध्ये पुन्हा पुन्हा दावे उत्पन्न होवु नयेत या कारणांसाठी तसेच दोन्ही पक्षकारांतील वादाचे समुळ उच्चाटन करण्यासाठी सदर दावा दुरूस्तीस परवानगी देणे न्यायाचे दृष्टिने योग्य होईल. सबब, सदरचा अर्ज वादींवर खर्च लादुन मंजुर होण्यास पात्र आहे, त्याबाबतचा सविस्तर आदेश मी खालील प्रमाणे पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. सदरचा अर्ज रक्कम रूपये १,०००/- खर्च लादून मंजुर करण्यात येतो. सदरचा खर्च प्रतिवादींना देण्याचा आहे.

२. वादींनी सदरची दुरूस्ती सदरचा आदेश पारीत झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत करावी.

Sangita Pundlik Babar
Digitally signed by Sangita Pundlik Babar
Date: 2022.12.07 16:15:39 +0530

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- ०७.१२.२०२२.

(श्रीमती. एस. पी. बाबर)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.